## संकेतशब्द (पासवर्ड) विसरलात :

अर्जदार DBT पोर्टलवर लॉगिन करण्यासाठी वापरण्यात येणारा संकेतशब्द (पासवर्ड) विसरल्यास, DBT पोर्टलच्या मुख्य पृष्ठावरील "Forgot Password" बटनवर क्लिक करा.






उपरोक्त स्क्रीनवर, अर्जदाराने पोर्टलवर लॉगिन करण्यासाठी वापरले जाणारे आपले वापरकर्ता नाव प्रविष्ट करावे व "Get OTP" बटनवर क्लिक करा. प्रविष्ट केलेले वापरकर्ता नाव वैध असेल तरच खालील स्क्रीन प्रदर्शित होईल.




"Ok" बटन वर क्लिक करा




पोर्टलवर नोंदणीकरणाच्या प्रक्रियेत प्रविष्ट केलेल्या नोंनीकृत मोबाइल क्रमांकावर अर्जदारास OTP संदेश प्राप्त होईल. अर्जदाराने प्राप्त OTP प्रविष्ट करून नवीन संकेतशब्द (पासवर्ड) प्रविष्ट करावा आणि संकेतशब्द (पासवर्ड) पुष्टी करावी.

टीप : संकेतशब्द (पासवर्ड) ची लांबी किमान ८ आणि कमाल २० वर्ण पर्यंत असावी. संकेतशब्दामधे किमान १ मोठे अक्षर, १ छोटे अक्षर, १ संख्या आणि १ विशेष वर्ण असणे आवश्यक आहे. तसेच नवीन संकेतशब्द (पासवर्ड) आणि संकेतशब्द (पासवर्ड) पुष्टी दोन्ही समान असणे अनिवार्य आहे.

उपरोक्त पायरी पूर्ण झाल्यावर "Set Password" बटनवर क्लिक करा




आता लॉगिन करताना, वापरकर्ता नाव आणि सेट केलेला नवीन संकेतशब्द (पासवर्ड) प्रविष्ट करा